# प्रकरण १ :- भारतीय राज्यघटना

I प्रस्तावना :-

"देशाचा राज्यकारभार करण्यासाठी जे लिखीत किंवा अलिखित नियम तयार केले जातात, त्याच नियमांच्या समुहाला संविधान किंवा राज्यघटना असे म्हणतात." प्रत्येक देशाचा राज्यकारभार आपापल्या देशाच्या संविधानानुसार केला जातो. देशाचा राज्यकारभार करण्यासाठी शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी व्यक्तीवर व देशातील विविध संस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी व्यक्तीचे संरक्षण करण्यासाठी राज्यघटनेची आवश्यकता असते. राज्यघटना नसेल तर, देशात अशांतता, गोंधळ, गरबड, अन्याय, अत्याचार, पिळवणूक, जुलूम जबरदस्ती, बळी तो कान पिळी याची व्यवस्था अस्तित्वात येते.

संविधानाची निर्मिती एका संविधान सभेद्वारे किंवा घटनापरिषदेद्वारे केली जाते. संविधान सभेचा विचार सर्वप्रथम हेन्री मेन यांनी मांडला आहे. परंतू अमेरिकेने सर्वप्रथम संविधान सभेद्वारे संविधानाची निर्मिती केली आहे. अमेरिकेनंतर फ्रान्स ने व इतर देशांनी संविधान सभेच्या माध्यमातून लिखीत संविधानाचा स्विकार केला आहे. परंतू यास इंग्लंड मात्र अपवाद आहे.

1) II भारतातील संविधान सभेचा उदय व विकास :-

भारतामध्ये संविधान सभेचा विचार सर्वप्रथम 1895 मध्ये लोकमान्य टिळकांनी मांडला. 20 व्या

शतकात इ.स 1922 मध्ये महात्मा गांधी यांनी भारतीय संविधान भारतीयांच्या इच्छेनुसार बनेल असा विचार मांडला. 1924 मध्ये पंडित मोतीलाल नेहरू यांनी ब्रिटीशांसमोर संविधान सभेची मागणी केली. एम्. एन. रॉय यांनी ही या विचाराचे प्रतिपालन केले. इ.स 1936 च्या लखनौ, व इ.स 1938 च्या हरिपूर कॉंग्रेस अधिवेशनात संविधान सभेची मागणी केली. असे असले तरी या विचाराला मूर्त रूप देण्याचे कार्य पंडित नेहरू यांनी केले.

ब्रिटीश सरकारने 8 ऑगस्ट 1940 च्या प्रस्तावाला मान्यता दिली. भारतीयांचे संविधान भारतीय बनवतील यास मान्यता दिली. 29 मार्च 1942 च्या क्रिप्स योजनेद्वारा भारतामध्ये एक निर्वाचीत संविधान सभा असेल हे मान्य करून 1946 मध्ये कॅबिनेट मिशन योजनेमध्ये भारतीय संविधान सभेचा प्रस्ताव स्विकारून व्यवहारिक रूप देण्यात आले.

III <u>संविधान सभेची स्थापना</u> :

कॅबिनेट मिशन योजनेद्वारा भारतीय संविधान निर्माण करण्यासाठी निवडणूकीच्या आधारावर एका संविधान सभेची स्थापना करण्यात आली. संविधान सभेमध्ये 389 सदस्य होते त्यापैकी
1) ब्रिटीश प्रांताचे 292 प्रतिनिधी होते
2) मुख्य कमिशनरच्या प्रांताचे 4 प्रतिनिधी होते
3) देशातील संस्थानिकांचे 93 प्रतिनिधी होते

389 पैकी पहिल्या दोन प्रतिनिधींची म्हणजेच 296 प्रतिनिधी निवडणूकीच्या माध्यमातून निवडण्यात आले व 93 प्रतिनिधी संस्थानिकांनी नेमले. संविधान सभेच्या निवडणूका जुलै, ऑगस्ट 1946 मध्ये पार पडल्या

संविधान सभेची पहिली बैठक 9 डिसेंबर 1946 रोजी दिल्ली येथे संसद भवनाच्या केंद्रिय कक्षामध्ये पार पडली. त्यामध्ये डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांना तात्पुर्ते अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले. 11 डिसेंबर 1946 च्या बैठकीत डॉ. राजेंद्र प्रसाद यांची स्थायी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी.एन राव यांना संविधान सभेच्या संविधानिक सल्लागार या पदावर नियुक्त करण्यात आले. 13 डिसेंबर 1946 ला पंडित नेहरु यांनी संविधानाचा उद्देश म्हणजे उद्देशपत्रिका किंवा सरनामा प्रस्तुत केली. ही उद्देशपत्रिका 23 जानेवारी 1947 ला स्विकारण्यात आली संविधान तयार करण्याचे काम सोपे जावे यासाठी विविध समित्याची स्थापना करण्यात आली. त्यात मसुदा समिती ही मुख्य समिती होती.

संविधान सभेने 29 ऑगस्ट 1947 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसूदा समिती स्थापन केली. मसुदा समितीमध्ये के.एम. मुन्शी, ~~संविधान~~ ~~मर~~ मोहम्मद सादुल्ला, बी.एल. मित्तल, अल्लादीन कृष्णस्वामी अय्यर, एन. गोपालस्वामी अय्यंगर, डी.पी खेतान या सदस्यांचा समावेश होता. काही दिवसानंतर डी.एन मित्तल त्या जागेवर एन. माधवराव व खेतान यांच्या मृत्यूनंतर

टी. टी. कृष्णमाचार्य यांना घेण्यात आले. 30 ऑगस्ट 1947 ला मसूदा समितीची पहिली बैठक झाली. इतर समितींच्या शिफारशीवर विचार करण्याचे कार्य मसुदा समितीद्वारे केले जात होते. त्यामुळे या समितीची भूमिका संविधान सभेमध्ये महत्वाची होती. या समितीनी संविधानाच्या कच्चा आराखडा / मसुदा तयार करून 7 फेब्रुवारी 1948 ला संविधानसभेच्या अध्यक्षाकडे सुपूर्द केला. संविधान सभेसमोर तो मसूदा 4 नोव्हें 1948 विचारविनिमय करण्यासाठी ठेवला. संविधान सभेनी 1 वर्ष त्यावर विचार विनिमय करून 26 नोव्हेंबर 1949 ला संविधानास मंजूरी दिली, व 26 जानेवारी 1950 संविधानाची अंमलबजावणी करण्यात आली. संविधानात 395 कलम, 22 भाग आहेत. संविधान तयार करण्यासाठी 2 वर्ष 11 महिने 18 दिवस लागले.

## 2) भारतीय संविधानाची उगमस्थाने

★ संविधान निर्मीतीची साधने किंवा स्त्रोत :-

भारताचे संविधान तयार करताना संविधान सभेच्या सदस्यांनी ज्या साधनांचा वापर केला. त्या साधनांचा किंवा उगमस्थानकांचा विचार करणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाची साधने 2 भागामध्ये विभाजीत करता येतील.

(I) जन्मासंबंधी साधने :-

(II) विकासासंबंधीची साधने :-

I जन्मासंबधी साधने :-

भारताची राज्यघटना तयार करताना संविधान सभेच्या सदस्यांनी ज्या साधनांचा आधार घेतला त्याचा समावेश जन्मासंबधी साधनामध्ये केला जातो. जन्मासंबधी साधनाचे ① विदेशी साधने व ② देशी साधने या दोन भागामध्ये वर्गीकरण करता येईल.

① विदेशी साधने (स्त्रोत) :-

संविधान सभेच्या सदस्यांनी विविध देशाच्या राज्यघटनेचा अभ्यास करून भारतीय परिस्थिती लक्षात घेवून त्यांच्या संविधानातील काही गोष्टींचा स्विकार केलेला आहे. त्याचा विचार पुढीलप्रमाणे सांगता येईल.

अ] ब्रिटीश संविधान :-

A) संसदीय लोकशाही शासन व्यवस्था
B) कायद्याचे राज्य
C) एकेरी न्यायव्यवस्था
D) एकेरी नागरिकत्व
E) एकेरी नोकरशाही
F) कायदा निर्मितीची प्रक्रिया
G) सामूहिक जबाबदारी इ. अनेक तत्वांचा स्विकार इंग्लंडकरून करण्यात आलेला आहे.

ब] अमेरिकेचे संविधान :-

A) उद्देशपत्रिका
B) मुलभूत अधिकार
C) न्यायालयीन पुर्णविलोकन

Scanned with CamScanner

D) संविधानांचे श्रेष्ठत्व
E) राष्ट्रपतीवरील महाभियोगाचा खटला.
F) उपराष्ट्रपतीचे पद इ. घटकांचा स्विकार अमेरिकेच्या संविधानकडून केला आहे.

क] आयर्लंडचे संविधान :
A) राज्याची मार्गदर्शक तत्वे
B) राष्ट्रपतीच्या निवडणूकीतील निर्वाचन मंडळ
C) राज्यसभेमध्ये साहीत्य,कला, विज्ञान, समाजसेवा इ. क्षेत्रामध्ये प्रसिद्ध आलेल्या व्यक्ती नेमणूक इ.

ड] कॅनडाची राज्यघटना :
A) संघराज्याचा स्विकार
B) शेषाधिकार केंद्रसरकारला असणे इ. चा स्विकार केलेला आहे

इ] ऑस्ट्रेलियाची राज्यघटना :
A) संविधानाच्या प्रस्तावनेची भाषा
B) समवर्ती सुची.

उ] दक्षिण आफ्रिकेची राज्यघटना :
भारताचे संविधान दुरुस्तीची पद्धत दक्षिण आफ्रिकेकडून स्विकारली आहे.

ऊ] जर्मनीची राज्यघटना :
जर्मनीकडून राष्ट्रपतीचे आणिबाणि विषयक अधिकार स्विकारण्यात

Scanned with CamScanner

आलेला आहे.

② देशी साधने :

अ) नेहरू रिपोर्ट :

इ.स 1928 च्या नेहरू रिपोर्टमधील अनेक घटकांचा स्विकार भारतीय संविधानामध्ये केलेला आहे.

A) भारतीय संविधान संघीय स्वरूपाचे असेल.
B) देशातील संस्थानिकांचे वेगळे अस्तित्व असणार नाही.
C) संस्थानीकांना संघराज्यामध्ये सामील व्हावे लागेल.
D) अल्पसंख्याकांचे संरक्षण केले जाईल.

इ. अनेक तत्वांचा स्विकार करण्यात आलेला आहे

ब) 1935 चा कायदा :

भारतीय संविधानावर 1935 च्या कायद्याचाही प्रभाव पडलेला दिसून येतो. 1935 च्या कायद्यातील अनेक तत्वे भारतीय संविधानामध्ये घेण्यात आले आहेत

A) केंद्र आणि राज्यामध्ये सत्ता विभाजन
B) राज्यपालाचे पद
C) द्विगृही कायदेमंडळ
D) सरकारचे तीन अंग. इ. स्विकार केलेला आहे.

Scanned with CamScanner

(II) विकासासंबधीची साधने (स्त्रोत) :-

26 जानेवारी 1950 ला राज्यघटनेची अमंलबजावणी झाली. तेव्हा पासून आज पर्यंत भारतीय संविधानात मोठ्या प्रमाणात बदल किंवा परिवर्तन झाले आहे. त्या सर्व बदलांचा समावेश विकासासंबधीच्या साधनामध्ये केला जातो. त्याचा विचार खालीलप्रमाणे करता येईल

(1) कायदा नियम, अध्यादेश :

केंद्र सरकार व राज्यसरकार द्वारे कायदे व नियम तयार केले जातात त्या कायद्याचा व नियमाचा समावेश संविधानाच्या साधनामध्ये होतो. सर्व कायदे व नियम संविधानिक स्वरूपाचे असतात. कायदेमंडळाच्या विश्रांतिच्या काळात राष्ट्रपतीला अध्यादेश काढण्याचा अधिकार आहे. त्याचा समावेश ही संविधानाच्या साधनामध्ये होतो.

(2) रूढी, परंपरा, प्रथा व संकेत :-

भारतीय संविधानीतील अलिखित भाग म्हणजे रूढी, परंपरा किंवा चालीरीती होय. सरकारमध्ये रूढीपरंपरेला विशेष महत्व असते. या प्रथा संविधानाचा एक भाग असतात. भारतामध्ये अनेक रूढीपरंपरा आहेत.

उदा.

संविधानाने सर्व अधिकार राष्ट्रपतीला दिले आहेत. परंतु रूढीपरंपरेनुसार राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या किंवा पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार त्या अधिकाराचा वापर करतो. पंतप्रधानाची नेमणूक करण्याचा अधि-

-कार राष्ट्रपतीला असला तरी तो लोकसभेतील बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्यालाच पंतप्रधान पदी नेमतो इ. अनेक रुढी परंपरा भारतामध्ये अस्तित्वात आहेत.

③ न्यायालयीन निर्णय :-

कायदेमंडळांनी तयार केलेल्या कायद्याचा अर्थ लावण्यासाठी, तसेच संविधानातील तरतूदींचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी देशामध्ये न्यायमंडळ कार्यरत आहे. सर्वोच्च व उच्च न्यायालयांनी असे अनेक निर्णय दिले आहेत जे संविधाचे अंग किंवा भाग बनले आहेत

उदा.

गोपालन विरुद्ध मद्रास राज्य या केसच्या संदर्भात दिलेला निर्णय, तसेच केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या केसच्या संदर्भात दिलेला निर्णय इ.

④ घटनादुरुस्ती / संविधानसंशोधन :-

इ.स 1950 पासून आजपर्यंत काळानुसार राज्यघटनेमध्ये अनेकवेळा दुरुस्ती परिवर्तन करण्यात आले आहे. आतापर्यंत झालेल्या घटनादुरुस्तीमध्ये 42 वी व 44 घटनादुरुस्ती सर्वात मोठी घटनादुरुस्ती आहे. विकासासंबंधीच्या साधनात सर्व घटनादुरुस्त्यांचा समावेश होतो.

(५) संविधानावरील ग्रंथ किंवा तज्ञांचे विचार :-

भारतीय संविधानाच्या उगमस्थानकामध्ये संविधानावरील ग्रंथांचाही समावेश होतो. भारतीय संविधानावर अनेकांनी ग्रंथ लिहीले आहेत. त्या सर्व ग्रंथांचा समावेश यामध्ये होतो. डी. डी. बसू, एम. ए. पालखीवाला, एम.सी सितलवाड, सुभाष काश्यप इ. अनेक तज्ज्ञांनी संविधानावर ग्रंथ लिहीले आहेत

इ. अनेक साधनांचा समावेश केला जातो

## ७) भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका :-

I प्रस्तावना :-

प्रत्येक देशाच्या / देशातील संविधानाच्या प्रारंभी उद्देशपत्रिका किंवा सरनामा असतो. सरनाम्यामध्ये संपूर्ण संविधानाचा सारांश स्पष्ट केलेला असतो. प्रत्येक देशाची राज्यघटना कोणत्यातरी उद्देशाने प्रेरित होवून लिहीलेली असते. "त्या उद्देशाच्या संक्षिप्त मांडणीला उद्देशपत्रिका असे म्हणतात."

उद्देशपत्रिका ही महत्वाची असते. संविधानाच्या सुरवातीला उद्देशपत्रिका असते. संविधानाचा प्राण आत्मा किंवा महत्वाचा गाभा म्हणून उद्देशपत्रिकेचा उल्लेख केला जातो. के. एम. मुन्शी यांनी उद्देशपत्रिकेला राजकीय जन्मकुंडली असे म्हटले आहे. संविधानाचे मापन करण्याचे एक मापदंड आहे. संविधानाचे सर्व कलम या मापदंडाने मोजले जाते. असे असले तरी कायद्याच्या दृष्टिने उद्देशपत्रिकेला संविधानाचा भाग

समजले जात नाही. किंवा उद्देशपत्रिका कायद्याच्या नियंत्र-णात येत नाही.

इ.स 13 डिसें 1946 ला पंडित नेहरू यांनी संविधानसभेसमोर उद्देशपत्रिकेचा प्रस्ताव मांडला. संविधान सभेनी (22) जानेवारी 1947 ला उद्देशपत्रिकेचा प्रस्ताव स्विकारला. इ.स 26 नोव्हेंबर 1949 उद्देशपत्रिका मंजूर करण्यात आली.

II उद्देशपत्रिका :-

आम्ही भारतीय जनता,
भारताचे सार्वभौम, समाजवाद, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण करण्याचे आणि
भारताच्या सर्व नागरिकांना

सामाजिक, आर्थिक आणि राजकीय ... न्याय
विचार, उच्चार, विश्वास.
श्रद्धा आणि उपासना
याचे --- स्वातंत्र्य
दर्जा आणि संधी याबाबत --- समता
व्यक्तीची प्रतिष्ठा आणि
राष्ट्राचे ऐक्य आणि अखंडता राखणारी --- बंधुता
याची शाश्वती देण्याचे आमच्या या
घटनासमितीत आज नोव्हेंबर 1949
च्या 26 व्या दिवशी विचारपूर्वक
ठरवित आहोत व ही घटना
आमच्याप्रती तयार, मान्य, स्वीकृत
करीत आहोत.

वरील उद्देशपत्रिकेमध्ये (1) सार्वभौम
(1) समाजवाद (2) धर्मनिरपेक्ष (3) अखंडता या तीन शब्दांचा समावेश इ.स 1976 मध्ये 42 वी घटना-दुरुस्ती करून करण्यात आलेला आहे. मूळ संविधानाच्या उद्देशपत्रिके 1976 च्या अगोदर हे तीन शब्द उद्देशपत्रिकेमध्ये नव्हते.

उद्देशपत्रिकेवरून तीन गोष्टी स्पष्ट होतात

1) संविधानाचे उगमस्थान :-

आम्ही भारतीय जनता या वाक्याने उद्देशपत्रिकेची सुरुवात आहे. संविधानाचे उगमस्थान भारतीय जनता आहे. भारतीय जनतेनेच संविधान तयार केले मान्यता देवून स्वीकृत केली हे स्पष्ट होते. हे संविधान जनतेवर कोणीही लादलेले नाही हे स्पष्ट होते.

2) राज्यव्यवस्थेचे स्वरूप :-

उद्देशपत्रिकेवरून भारतातील राज्यव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट होते. सार्वभौम, समाजवाद, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक गणराज्याचे स्वरूप भारताच्या राज्यव्यवस्थेचे आहे. हे स्पष्टपणे लक्षात येते.

3) राज्यव्यवस्थेचा उद्देश :-

उद्देशपत्रिकेवरून भारतातील राज्यव्यवस्थेच्या स्वरूपाप्रमाणेच राज्यव्यवस्थेचा उद्देशही स्पष्ट होतो. राज्याची काही ध्येय किंवा उद्दिष्ट्ये असतात. त्या ध्येयाची पुर्तता

1789 - संविधाननिर्मिती (अमेरिका)
- घटना दुरुस्ती 26 केल्या

अमेरिकन राज्यक्रांती - 1776
फ्रेंच राज्यक्रांती - 1789

करण्याचे काम सरकारद्वारे केली जातात. त्याशिवाय समाजाला पर्यायाने राज्याला स्थैर्य प्राप्त होत नाही. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही चार उदिदष्टये राज्याची आहेत. त्यांची स्पष्टपणे उल्लेख उद्देशपत्रिकेमध्ये करण्यात आलेला आहे.

## ५). भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये :-

① प्रस्तावना :-

भारतीय संविधानाची निर्मिती संविधान सभेद्वारे झालेली आहे. संविधान सभेमध्ये 389 सदस्य होते. संविधान सभेचे डॉ. सच्चिदानंद सिन्हा अस्थायी किंवा तात्पुरते अध्यक्ष होते. व डॉ. राजेंद्र प्रसाद हे स्थायी अध्यक्ष होते. या घटनापरिषदेच्या सदस्यांनी 2 वर्ष 11 महिने व 18 दिवसात भारताची राज्यघटना तयार केली. घटना तयार करताना विविध समित्यांची स्थापना करण्यात आली होती. त्यात मसूदा समिती महत्वाची होती. मसूदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. विविध देशाच्या संविधानाच्या अभ्यास करून भारताची राज्यघटना तयार करण्यात आली. इंग्लंडच्या राज्यघटनेचा प्रभाव मोठया प्रमाणात भारताच्या राज्यघटनेवर पडलेला आहे. 26 नोव्हेंबर 1949 संविधानसभेनी राज्यघटनेला मंजूरी दिली व 26 जानेवारी 1950 पासून भारताच्या राज्यघटनेची अंमलबजावणी झाली. त्या संविधानाची वैशिष्टये किंवा लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

Scanned with CamScanner

II वैशिष्ट्ये :-

① लिखीत राज्यघटना :-

संविधानाचे लिखीत व अलिखीत अशा दोन भागात विभाजन केले जाते. देशाचा राज्यकारभार करण्यासाठी तयार करण्यात आलेले नियम कायदे लिहून ठेवण्यात आलेले असतील तर ती राज्यघटना लिखीत स्वरूपाची असते. भारताची राज्यघटना ही लिखीतच आहे. जगामध्ये लिखीत राज्यघटनेचा स्विकार सर्वप्रथम अमेरिकेमध्ये करण्यात आलेला आहे. इंग्लंड सोडून इतर सर्व देशाच्या राज्यघटना लिखीत स्वरूपाच्याच आहेत. जगातील एकमेव अलिखीत राज्यघटना इंग्लंडची आहे.

② मोठी (विस्तृत) राज्यघटना :-

भारताची राज्यघटना जगामध्ये सर्वात मोठी आहे. संविधानातील कलमाच्या संख्येवरून राज्यघटना लहान आहे की मोठी आहे ते ठरविले जाते. भारताच्या राज्यघटनेत 395 कलम, 12 परिशिष्टे, व 22 भाग आहेत. भारताच्या संविधानात प्रत्येक गोष्टीचा सविस्तर उल्लेख करण्यात आलेला आहे.

उदा मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे विस्तृतपणे मांडलेले आहे त्यामूळे भारताची राज्यघटना मोठी दिसून येते. जगामध्ये सर्वात लहान राज्यघटना अमेरिकेची आहे. अमेरिकेची राज्यघटना 7 कलमाची व 12 पृष्ठाची आहे.

Scanned with CamScanner

③ निर्मीत राज्यघटना :-

संविधानाचे निर्मीत व अनिर्मीत (विकसित) किंवा (उत्क्रांत) या दोन भागात वर्गीकरण केले जाते. संविधान विशिष्ठ सदस्य एकत्र येवून विशिष्ठ काळात बैठका, चर्चा करून संविधान सभेद्वारे तयार केले असेल तर त्यास निर्मीत राज्यघटना असे म्हणतात. विशिष्ठ सदस्य एकत्र न येता रुढी परंपरेनुसार राज्यघटना अस्तित्वात आलेली असेल तर त्यास विकसित किंवा अनिर्मीत राज्यघटना असे म्हणतात. भारताची राज्यघटना निर्मीत आहे. जगामध्ये इंग्लंडची एकमेव राज्यघटना अनिर्मीत किंवा विकसित आहे.

④ संमिश्र राज्यघटना :-

भारताची राज्यघटना संमिश्र स्वरूपाची आहे. घटना (संविधान) तयार करताना घटनाकारांनी इतर देशाच्या संविधानाचा अभ्यास करून त्यांनी चांगल्या तत्वांचा स्विकार करून भारताची राज्यघटना तयार केली आहे. त्यामूळे संमिश्र राज्यघटना हे एक संविधानाचे वैशिष्ट्ये सांगितले जाते.

उदा :- इंग्लंडकडून संसदीय लोकशाहीचा, अमेरिकेकडून मुलभूत हक्काचा, आर्यलँडकडून मार्गदर्शक तत्वाचा, कॅनडाकडून संघराज्याचा, फ्रान्सकडून गणराज्याचा स्विकार करून भारताची राज्यघटना तयार करण्यात आली.

⑤ अंशत: ताठर व अंशत: लवचिक राज्यघटना :-

(एकात्मता)

देशाची राज्यघटना ताठर आहे का लवचिक आहे हे घटनादुरूस्तीच्या पद्धतीवरून लक्षात येते. घटनादुरूस्तीची पद्धत साधी सोपी असेल तर त्या देशाची राज्यघटना लवचिक असते. आणि घटनादुरूस्तीची पद्धत अवघड किंवा कठिण असेल तर त्या देशाची राज्यघटना लवचिक नसते. इंग्लंडची राज्यघटना लवचिक तर अमेरिकेची राज्यघटना ताठर स्वरूपाची आहे. परंतू भारताचे संविधान इंग्लंडप्रमाणे लवचिक नाही आणि अमेरिके प्रमाणे ताठर नाही. तर भारताने या दोन्ही पद्धतीचा स्विकार केलेला आहे साध्या बहुमताने विशेष बहुमताने भारतीय संविधानात बदल केला जात असल्यामुळे भारताचे संविधान अंशतः ताठर आणि अंशतः परिवर्तनीय दिसून येते.

⑥ सार्वभौम, समाजवाद, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक गणराज्याचा स्विकार :-

संविधानाच्या उद्देशपत्रिकेमध्ये याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. भारत देशांतर्गत व बाह्यदृष्ट्या स्वतंत्र्य किंवा सार्वभौम आहे. भारतावर कोणाचेही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नियंत्रण नाही 15 ऑगस्ट 1947 पासून भारत सार्वभौम राज्य बनले आहे.

भारताने समाजवादाचाही स्विकार केलेला आहे. आर्थिक, सामाजिक समता प्रस्थापित करणे, श्रीमंत, गरिबीमधील भेद दूर करणे. बेकारी दूर करणे प्रत्येकाच्या हाताला काम देणे इ. हा उद्देश राज्याचा असतो नसेच राज्यासमोर सर्वधर्म समान असतील कोणत्याही धर्माला राज्याद्वारे विशेष स्थान दिले जाणार नाही

भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य असले तरी भारतीय नागरिकांना धार्मिक स्वतंत्र्य असते.

भारतात प्रजासत्ताक म्हणजे लोकशाही शासनव्यवस्था असेल. भारतात अंतिम सत्ता लोकांची आहे. प्रतिनिधीच्या माध्यमातून लोक किंवा जनता राज्यकारभार करत असतात. लोकशाहीबरोबर गणराज्याचाही स्विकार केलेला आहे. राज्याच्या प्रमुख जनतेतर्फे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष पणे निवडला जातो.

## ⑦ संसदीय शासनव्यवस्थेचा स्विकार :-

भारतामध्ये संसदीय लोकशाही शासनव्यवस्थेचा स्विकार करण्यात आलेला आहे. संसदीय शासनव्यवस्थेचा स्विकार इंग्लंडकडून केला आहे. संसदीय शासनव्यवस्थेमध्ये संसद सर्वश्रेष्ठ असते शासनाचे एक वास्तविक व एक नाममात्र असे दोन प्रमुख असतात. कायदेमंडळातून कार्यकारी मंडळाची निर्मीती केली जाते. (मंत्रीमंडळाची) मंत्रीमंडळामधील मंत्री हा कायदे- मंडळाचा सदस्य असलाच पाहीजे. नसल्यास त्यांनी 6 महिन्याच्या आत कायदेमंडळाचे सदस्यत्व स्विकारले पाहीजे. संसदीय शासनव्यवस्थेत कायदेमंडळाचे कार्यकारी मंडळा- वर नियंत्रण असते. कार्यकारिमंडळ म्हणजेच मंत्रिमंडळ कायदेमंडळास वयक्तीक व सामूहिक रित्या जबाबदार असते. यास संसदीय शासनव्यवस्था या नावाने ओळखले जाते.

## ⑧ एकात्म शासनव्यवस्थेकडे झूकलेले संघराज्य :-

शासनाचे एकात्म शासन व्यवस्था व संघात्मकशासनव्यवस्था या दोन

भागामध्ये वर्गीकरण / विभाजन केले जाते. केंद्रसरकार किंवा राज्यसरकार यांच्यात विभागणी केलेली असते त्या शासन व्यवस्थेला संघराज्य असे म्हणतात. केंद्रसरकार व राज्य सरकार यांच्यात सत्तेची विभागणी न करता सर्वसत्ता केंद्रसरकारच्या हातामध्ये असेलतर त्या शासनव्यवस्थेला एकात्म शासन व्यवस्था असे म्हणतात. एकात्म शासन व्यवस्थेमध्ये एकेरी संविधानाच्या / एकेरी नागरिकत्वाच्या एकेरी न्यायव्यवस्थेचा स्विकार केला जातो. भारतीय शासन व्यवस्था कशी असेल याची तरतूद संविधानाच्या कलम 1 ते 4 मध्ये करण्यात आलेली आहे. भारताच्या संविधानात संघराज्याऐवजी राज्यांचा युनियन ऑफ स्टेट्‌स असा उल्लेख करण्यात आलेला आहे. भारतात काही तत्व संघराज्याचे तर काही तत्वे एकात्म शासनव्यवस्थेची स्विकारण्यात आलेली आहेत. भारताच्या संघराज्यास अर्धसंघराज्य किंवा एकात्म शासनव्यवस्थेकडे झुकलेले संघराज्य असे म्हणतात.

(9) सरनामा / उद्देशपत्रिका / प्रस्तावना :-

(10) मुलभूत अधिकार :

भारतीय संविधानाच्या ~~कल~~ तिसऱ्या भागातील कलम 12 ते 35 मध्ये मुलभूत हक्कांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. भारताने मुलभूत हक्कांचा स्विकार अमेरिकेकडून केलेला आहे. मुलभूत हक्कामध्ये.

(1) समतेचा हक्क

(2) स्वातंत्र्याचा हक्क

(3) शोषणाविरुद्धचा हक्क

4) धर्मस्वातंत्र्याचा हक्क
5) शिक्षण व संस्कृतीचा हक्क
6) न्यायालयीन संरक्षणाचा हक्क

इ. सविस्तर घटनेत
उल्लेख करण्यात आलेला आहे व त्यास न्यायालयीन संरक्षण प्राप्त झाले आहे.

(11) मार्गदर्शक / नितिनिर्देशक तत्वे :-

(12) मुलभूत कर्तव्य :-

(13) एकेरी संविधान :-

एकेरी संविधान हे एकात्म शासन व्यवस्थेचे वैशिष्टये आहे. देशातील घटकराज्याचे वेगळे संविधान तयार न करता. संपूर्ण देशासाठी एकच संविधान भारतामध्ये तयार करण्यात आले आहे. अमेरिकेप्रमाणे घटकराज्याचे वेगळे व देशाचे वेगळे दुहेरी संविधान भारतामध्ये नाहि भारतात एकेरी संविधानाचाच स्विकार करण्यात आलेला आहे. परंतू यास जम्मू-काश्मिर अपवाद आहे.

(14) एकेरी नागरिकत्व :-

एकेरी व दुहेरी असे असे नागरिकत्वाचे दोन प्रकार पडतात देशामध्ये कोणत्याही घटकराज्यामध्ये राहणाऱ्या व्यक्तीला आपापल्या घटकराज्याचे नागरिकत्व न देता संपूर्ण देशाचे एकच नागरिकत्व दिले जाते. त्यास एकेरी नागरिकत्व असे. म्हणतात अमेरिकेमध्ये मात्र दुहेरी नागरिकत्व आहे.

Scanned with CamScanner

(15) एकेरी न्यायव्यवस्था :-

भारतामध्ये एकेरी न्यायव्यवस्थेचा स्विकार करण्यात आला आहे. पिरॅमिडसारखी न्यायव्यवस्था असून एका समान कायद्यानुसार भारतामध्ये न्यायदानाचे कार्य केले जाते. वरिष्ठ न्यायालयाचा निर्णय कनिष्ठ स्तरावरील न्यायालयावर बंधनकारक असतो. भारतामध्ये सर्वोच्च न्यायालय अंतिम स्वरूपाचे न्यायालय आहे.

(16) जनतेचे सार्वभौमत्व :-

भारतीय संविधानाने जनतेचे सार्वभौमत्व प्रस्थापित केले आहे. संविधानाची सुरवात आम्ही भारतीय जनता या वाक्याने झाली आहे. तसेच उद्देश पत्रिकेच्या शेवटी हे संविधान स्वीकृत मान्य करीत आहोत. असे स्पष्ट करण्यात आले आहे. अंतिम सत्ता जनतेच्या हातामध्ये देण्यात आली आहे. जनता आपल्या प्रतिनिधीच्या माध्यमातून राज्यकारभार करीत असते. कोणत्या व्यक्तीच्या किंवा पक्षाच्या हातामध्ये सत्ता द्यायची हे निवडणूकीच्या माध्यमातून जनता करीत असते.

(17) इतर वैशिष्ट्ये :-

वरील वैशिष्ट्याशिवाय भारतीय संविधानाचे इतर अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील त्यामध्ये न्यायमंडळाचे स्वातंत्र्य, संविधानाचे श्रेष्ठत्व, कायद्याचे अधिराज्य, नियंत्रण आणि संतूलन, कल्याणकारी राज्य, आणिबाणीची तरतूद, व गणराज्याचा स्विकार, स्वतंत्र

निवडणूका / निपक्षपातीपणा, निवड, प्रौढ मताधिकार, सत्तेचे विकेंद्रीकरण, स्वातंत्र्य, समता, बंधुता, व न्यायालयीन पुनर्विलोकन व ~~द्विगृही कायद्याची सत्ता~~ द्विगृही कायदेमंडळ, सत्ता विभाजन इ. अनेक वैशिष्ट्ये भारतीय संविधानाची सांगितले जातात.

Scanned with CamScanner